नि.वाद क्र.४६/२००९
**गोपाल वि. ललिता**
वादीतर्फे वादी स्वता
नि.क्र.२८

( प्रतिवादींनी वाटणीच्या स्मरणपत्राच्या लेखास निशाणी देता येणार नाही या घेतलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने वादीच्या विधिज्ञानी असा युक्तीवाद केला की वादी हा त्या दस्तास पक्षकार आहे. तसेच तो दस्त वाटणीचा लेख नसुन वाटणीचे स्मरणपत्र आहे. त्यामुळे तो दस्त विशिष्ट रक्कमेच्या मुद्रांक पेपरवर लिहिलेला नसल्या कारणाने त्याला पुराव्या दरम्यान नाकारता येणार नाही. तसेच त्या दस्ताला कमलबाई पक्षकार नसल्याने तो दस्त नोदणीकृत असल्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे म्हणुन त्यांनी त्या दस्तास निशाणी देण्यात यावी अशी विनंती केली. प्रतिवादीच्या विधिज्ञानी उपरोक्त नमुद ज्या निर्णयावर भिस्त ठेवली ते न्यायनिर्णय या प्रकरणाला लागु पडत नाहीत. कारण त्यातील सिता राम भामा या प्रकरणातील न्यायनिवाडयामधील दस्त कौटुंबिक व्यवस्था आणि हक्क सोडण्याचा लेख होता. परंतु प्रस्तुत प्रकरणातील दस्त हा वाटणीचे स्मरणपत्र आहे. तसेच सुलतान सिंग वि. रतन सिंग,ऐ.आय.आर.१९८३,अलाहाबाद-६६ या वादीने दाखल केलेल्या न्यायनिर्णयात नमुद केल्याप्रमाणे वाटणीचे स्मरणपत्र नोदणीकृत असण्याची गरज नाही. अशाप्रकारे एकुण बाबी विचारात घेता प्रतिवादींनी प्रस्तुत दस्तास निशाणी देण्याबाबत घेतलेला आक्षेप खारीज करण्यात येत आहे आणि त्या अन्वये वादीच्या स्मरणपत्रास निशाणी ७८ देण्यात येत आहे. )

**प्रतिवादी तर्फे विधिज्ञ श्री.बाकलीवाल यांच्याकडून शपथेवर उलअ तपास सुरू**

प्रकाश अग्रवाल हा दावा मिळकतीतील तिस-या मजल्यावरील तीन खोल्यामध्ये राहतो. तिस-या मजल्यावर एकुण तीन भाडेकरू आहेत. दावा दाखल केला त्यावेळी अमोल मकासने, अनिल मावळे व व्यास असे तीन भाडे करू तिस-या मजल्यावर होते. आज रोजी तिस-या मजल्यावर सुनिल चौधरी,

राजु अग्रवाल व पांडे असे भाडेकरू आहेत. प्रकाश अग्रवाल हा दावा मिळकतीच्या तिस-या मजल्यावर नारायणदास अग्रवाल हयात होते तेव्हापासुन राहतो. आम्ही घर घेतले तेव्हापासुन प्रकाश अग्रवाल तेथे राहतो. प्रकाश अग्रवालचे वय आज रोजी अंदाजे ४० ते ४२ वर्षाचे आहे. तो पत्नी व मुलाबाळासह तेथे राहतो. प्रकाश अग्रवाल हा केवळ आमच्या परवानगीने त्या ठिकाणी राहतो याबाबत माझेकडे कोणताही दस्त नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रकाश अग्रवाल दावा मिळकतीमध्ये परवानगीने राहतो हे मी खोटे सांगत आहे.

तळ मजल्यावरील जागा नारायणदास अग्रवाल यांनी अकोट अर्बन बॅकेला भाडयाने दिली होती. तळ मजल्यावरील पुर्वी अकोट बॅकेकडे असलेली जागा सध्या न्यायालयाकडे आहे. अकोट अर्बन बॅक तळमजल्यावर भाडेकरू असतांना तळ मजल्याचा नगर पालिकेचा कर मी नगर पालिकेला कधीच भरला नाही. मी स्वता होवुन सांगतो की तो कर भरण्याचे काम बॅकेकडे होते. बॅक भाडेकरू होती तेव्हा बॅकेला त्यांच्या ताब्यातील जागेचा कर भरण्यासाठी कळविले होते. मी त्यांना तोंडी सांगितले होते. कर थकीत झाल्याबाबत नगर पालिकेने दावा मिळकतीवर जप्तीची नोटीस लावली होती. परंतु जप्तीची नोटीस असल्याबाबत मी कोर्टाला कळविले नाही. तळ मजल्यावरील कर नगर परिषदेचा प्रतिवादी ललिताने भरला. दुसरा किंवा तिस-या मजल्याचा दावा मिळकतीचा नगर परिषदेला कर कधीच भरला नाही. दावा मिळकतीच्या दुस-या आणि तिस-या मजलेचा नगर परिषदेचा कर प्रतिवादी क.१ ललिता भरते.

हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकत नारायणदासच्या मालकीची आहे. मी स्वता होवुन सांगतो की दावा मिळकत नारायणदास व भगवानदास या दोघाच्या मालकीची आहे. नारायणदासची पत्नी कमलाबाई तिच्या हयातीत दावा मिळकतीत राहत होती. दि.१४/०१/२००२ रोजी वाटणी झाली त्यावेळी मी स्वता, माझे वडील नारायणदास सिताराम अग्रवाल व साक्षीदार प्रेमकिशोर डिन्डोडीया, भगवानदास सिताराम अग्रवाल आणि धनाजी काशिराम मुटकुळे हे

सर्व हजर होते. वाटणी दुपारी ११ ते १२ च्या दरम्यान झाली. साक्षीदार देखिल त्याच वेळी हजर होते. प्रेमकिशोर डिन्डोंडीया हे माझे सासरे आहेत आणि ते जालना येथे राहतात. ते भाडयाच्या कारने आले होते. माझे सासरे दुस–या दिवशी कधी गेले परंतु ते परत गेल्याची वेळ मला आठवत नाही. जालना ते वाशिम अंतर १६० किलो मिटरचे आहे. त्यांना मी बोलावुन घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की धनाजी काशिराम मुटकुळे हा माझा नोकर आहे. तो अडगांव मुटकुळे,ता.व जिल्हा हिंगोली येथील रहिवासी आहे. अडगांव हे वाशिम पासुन अंदाजे २५ किलोमिटर अंतरावर आहे. धनाजी मुटकुळे हा वाटणी झाली त्या दिवशी संध्याकाळी परत गेला. धनाजीने माझे घरी जेवण केले नाही. १४/०१/२००२ रोजी कोणता वार होता हे माझे लक्ष्यात नाही. दि. १४/०१/२००२ रोजी वाटणीबाबतची लिखापडी केली नाही. लिखापडी दि. २०/०१/२००२ रोजी झाली त्यावेळी वर नमुद तीन साक्षीदार होते. २०/०१/२००२ रोजी कोणता वार होता हे माझे लक्ष्यात नाही. वाटणीचा लेख टंकलिखीत केला होता. तो लेख वडीलांनी टंकलिखीत करून आणला होता. तो लेख कोणाकडून टंकलिखीत करून घेतला हे मी वडीलांना विचारले नाही. दि. २०/०१/२००२ रोजी ललिताबाई कोयाळी येथे राहत होती. दि.२०/१/२००२ रोजी ललिताबाईला बोलाविले नव्हते. कमलाबाई त्या दिवशी घरीच होत्या. माझे सासरे दि.२०/०१/२००२ रोजी सकाळी ११ ते १२ वाजताच्या दरम्यान आले व त्याच दिवशी रात्री परत गेले. धनाजी मुटकुळे हा २०/०१/२००२ रोजी सकाळी ११ ते १२ वाजताच्या दरम्यान आला आणि रात्री परत गेला.

२०/०१/२००२ रोजीच्या वाटणीच्या स्मरणपत्राच्या आधारे नझुल दप्तरी नोंद दावादाखल करेपर्यत घेतली नव्हती. तसेच त्या आधारे आजपर्यत नगरपरिषदेला देखिल नोद घेतली नाही. वाटणीचे स्मरणपत्र दि. २०/०१/२००२ रोजीच मला पाहायला मिळाले होते. हे म्हणणे खरे नाही की वाटणीचे स्मरणपत्र नारायणदासजी यांनी टंकलिखीत करून आणले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की वाटणी करून दावा इमारत मला दिली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की दि.१४/०१/२००२

रोजी आमच्यामध्ये तोंडी वाटणी झाली नाही. हनुमानदास अग्रवाल माझे काका होते, ते वाशिम येथे राहत होते. दावा दाखल झाल्यानंतर नझुल कार्यालयातील नोदीबाबत वाद सुरू झाला होता. नझुल कार्यालयामध्ये नारायणदास यांनी त्यांच्यामध्ये आणि माझेमध्ये दावा मिळकतीची वाटणी झाली नाही असे लिहुण दिले हे मला माहित नाही. नझुल कार्यालयातील प्रकरणात मी हजर झालो होते परंतु तेथील कागदपत्रे मी पाहिले नाहीत.

**मध्यांतराची वेळ झाल्यामुळे पुढील उलट तपास तहकुब.**

दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)
दि.११.१०.२०१९ वाशिम

**मध्यांतराची वेळे नंतर पुढील उलट तपास शपथेवर सुरू**

**फेरतपास काही नाही.**

समक्ष

दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)
दि.११.१०.२०१९ वाशिम